भूमि आणि जिंदगी विभाग
दुरध्वनी क्र. : ०२०-६७३३१५३७ E-mail :Landestate@pcmcindia.gov.in
फॅक्स क्र. : ०२०-२७४२५६०० Website : www.pcmcindia.gov.in

जावक क्र. : भूजि/९/कावि १७९/२० दिनांक: ०९/०६/२०२१

महत्त्वाचे

विषय : पिंपरी चिंचवड मनपा मालकीच्या मिळकतींबाबत...

संदर्भ :
१.क्र.प्रशा/१/कावि/१२७०/८६, दि.२२/१२/१९८६
२.क्र.प्रशा/१/कावि/९०७/९०, दि.०४/१०/१९९०
३.क्र.प्रशा/१/कावि/५७४/९१, दि.१४/१०/१९९१
४. क्र. प्रशा/१/कावि/७२८/९५, दि. २९/०९/१९९५
५. क्र. प्रशा/१/कावि/७७७/९५, दि. २६/१०/१९९५
६.क्र. प्रशा/१/कावि/७२०/९६, दि. ०१/०८/१९९६
७.क्र. प्रशा/१/कावि/७५७/९७ दि. ०७/०८/१९९७
८.क्र. भूजि/१/कावि/३१४/२०१३, दि. ०२/०८/२०१३
९.क्र.भूजि/९/कावि/५०/२०२० दि. २८/०१/२०२०

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये झाल्यानंतर महानगरपालिकेच्या मिळकती संदर्भ क्र. १ अन्वये करसंकलन विभागाच्या नियंत्रणामध्ये करसंकलन विभागीय कार्यालयांच्या देखरेखीखाली होत्या. तदनंतर सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांना मिळकत नियंत्रणाचे अधिकार प्रदान करणेत आले. त्यानंतर मनपा मिळकतींचे दोन भाग करुन सदर मनपा मिळकतींवर सहाय्यक आयुक्त "अ" व "ब" यांचे नियंत्रण आले.

संदर्भ क्र. ४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चार प्रभाग समित्या स्थापन करुन त्यासाठी प्रभाग अधिकारी नियुक्त करणेत आले. संदर्भ क्र.६ अन्वये भूमि आणि जिंदगी विभागाची निर्मिती करणेत आली. संदर्भ क्र.७ अन्वये प्रभाग अधिकारी यांना त्यांचे क्षेत्रातील स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, आरोग्य, भुयारी गटर, व जलनि:सारण इ. विषयक कामकाज पार पाडणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळा, इमारती, मंडई, गाळे, दुकाने यांचा भोगवटा किंवा वापर करण्याबददल भाडयाने देणे, फी आकारणे, दुकान भाडे आणि फी १ वर्ष कालावधीपर्यंत मक्त्याने देणे अधिकार प्रदान करणेत आलेले आहेत.

तसेच संदर्भ क्र. ७ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८१-ब नुसार महानगरपालिकेच्या जागांतून व्यक्तींना काढून टाकण्याचे अधिकार प्रदान करणेत आलेले आहेत. पिंपरी चिंचवड शहरामध्ये चार प्रभाग समित्यांची स्थापना झाल्यानंतर प्रभाग कार्यालयांमध्ये मिळकतींचे रेकॉर्ड कमी-जास्त प्रमाणात विभागले गेले. प्रभाग कार्यक्षेत्रानुसार मिळकतींचे कागदपत्र संबंधित प्रभागांमध्ये परस्पर हस्तांतरीत झालेले आहेत.

संदर्भ क्र. ८ आणि ९ अन्वये महानगरपालिकेच्या मिळकतींचा बेकायदेशीर वापर, घुसखोरी, अतिक्रमण इ. रोखणेबाबत सर्व संबंधित विभाग प्रमुख, प्रभाग अधिकारी, शहर अभियंता, मुख्य उद्यान अधिक्षक, सहा. आयुक्त, क्रीडा विभाग यांना उचित कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

नियोजनानुसार –

१. आरोग्य विभागाशी संबंधित मिळकती आरोग्य विभागाच्या ताब्यात हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. उदा. सार्वजनिक संडास, मुतारी, दवाखाने, आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य कोठी, आरोग्य कार्यालयांची जागा, कचरा डेपोसाठीची जागा, कचरा कुंडीची जागा इ. मिळकती.

२. उद्यान विभागाकडे शहरातील बाग-बगीचे, उद्याने, उद्यानातील रखवालदारांसाठीचे केबिन, रोप वाटीकासाठीची जागा, निवास इ. मिळकती.

३. पाणीपुरवठा विभागाकडे पाणी पुरवठा करण्याची भूमिगत पाईपलाईनची जागा, जलशुध्दीकरण केंद्रासाठी आवश्यक जागा, पाण्याच्या टाक्या इ. मिळकती.

४. स्थापत्य विभागाकडे – रस्ता, फुटपाथ, पुल यासाठी ताब्यात घेण्यात आलेल्या जागा. त्याचप्रमाणे स्थापत्य झो.नि.पु.ने बांधलेल्या इमारती, वितरीत न केलेल्या मिळकती, जागा, रस्त्यासाठीच्या जागा व शिल्लक असणात्या जागा, पार्कींगसाठीच्या राखीव जागा इ.

५. बांधकाम परवागनी विभागाकडे आय टू आर अंतर्गत मिळालेल्या जागा, नियोजित इमारत बांधकामाच्या प्रयोजनार्थ ताब्यात असलेल्या जागा, मिळकती इ.

६. शिक्षण विभागाकडे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या शाळा इमारती, मनपाने शैक्षणिक प्रयोजनार्थ विकसित केलेल्या इमारती व शाळेची मैदाने.

७. वैद्यकीय विभागाकडील दवाखाने पुर्वी नगरपालिकाकाळापासून असणाऱ्या दवाखान्याच्या इमारती, स्मशान भूमीसाठीच्या जागा, भाडयाने जागा दिलेल्या मिळकती

८. स्थानिक संस्था कर विभागाकडे पुर्वीच्या जकात चालू असणाऱ्या कालखंडातील जागा, केबिन, बांधकाम असलेल्या मिळकती, रेकॉर्ड ठेवण्यासाठी ताब्यात देण्यात आलेल्या जागा

९. मलनि:सारण विभागाच्या ताब्यात असलेले मैला शुध्दीकरण केंद्र, केबिन, सदनिका इ.

१०. पशुवैद्यकीय विभागाच्या ताब्यातील दवाखाने, कोंडवाडे, रस्ता बाधित कोंडवाडे इ.

११. क्रीडा विभागाच्या विभागाच्या ताब्यात असणारे क्रीडांगणे, व्यायामशाळा, क्रीडा विषयक इमारती, जलतरण तलाव इ.

१२. बी आर टी एस विभागाकडील विकसित मिळकती -- बसस्टॉप, त्यालगतची जागा, बांधकाम इ. तपशील.

१३. विद्युत विभागाच्या ताब्यात असलेली नाटयगृह, प्रेक्षागृह इ. मिळकती, विद्युत साहित्य ठेवण्यासाठीची जागा .

१४. क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व प्रकारच्या मिळकती, सांस्कृतिक केंद्र, वाचनालय, स्पर्धा परीक्षा केंद्र , विरंगुळा केंद्र व पार्कींगसाठीची जागा इ.

१५. भांडार विभागाकडे खरेदी साहित्य ठेवण्यासाठीचे गोडाऊन, मोकळी जागा इ.

सबब या परिपत्रकाव्दारे पिंपरी चिंचवड मनपाच्या सर्व संबंधित विभागांना सूचित करणेत येते की उपरोक्तप्रमाणे नमूद मिळकतीं/रस्त्यांमध्ये बाधित झालेल्या, पुर्वीपासून ताब्यात असणाऱ्या मिळकती, नव्याने ताब्यात आलेल्या रस्ता रुंदीने अथवा अन्य कारणाने निष्कासित केलेल्या व आज मितीस ताब्यात असणाऱ्या मिळकतींचा तपशील तात्काळ अद्ययावत करणेत यावा. त्याची एक प्रत - हार्ड कॉपी आणि सॉप्ट कॉपी भूमि आणि जिंदगी विभागास पंधरा दिवसात दि.१८/०६/२०२१ पर्यंत देणेत यावी. तसेच अतिक्रमण, घुसखोरी, बेकायदेशीर वापर होत असलेल्या मनपा मिळकतींबाबत संबंधित विभागांकडून तात्काळ कायदेशीर कारवाई करावी. मनपा मिळकतींमध्ये घुसखोरी, अतिक्रमण, बेकायदेशीर वापर याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित विभाग प्रमुखांना जबाबदार धरणेत येऊन त्यांचेवर प्रशासकीय कारवाई करणेत येईल याची स्पष्ट नोंद घेणेत यावी.

08/06/21

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

प्रत : विभागप्रमुख